# <u>रक्तदान गीत</u>

चाल : या जन्माला सार्थक करण्या .......................

मानव एकता मिशन जागवी, घे तू हे समझुनी
गुरु वचनाचे पालन करुया रक्तदान करुनी

बलिदान हे सत्यासाठी, असे खरी कसौटी
लाविले आपुले प्राण पणाला, अमर ते संत जगती
आठवण त्यांची ठेवू आपण, विसरू नका हो कुणी
गुरु वचनाचे पालन करुया रक्तदान करुनी .......

लागो रक्त हे सत्कार्याला, जवान किसान, दुखिताना
परोपकारी हे जीवन बनवूया, जगताचा कल्याणा
जन सेवा ही उत्तम सेवा, सारे करू मिलुणी
गुरु वचनाचे पालन करुया रक्तदान करुनी .......

सफल करुया मानव जीवन, करुनी रक्तदान
विश्व बंधुत्व, सांगू जगाला, श्रेष्ट असे हे दान
मानवतेचा, धरम खरा हा, देवू या पटवूनी
गुरु वचनाचे पालन करुया रक्तदान करुनी .......

'गोपी' 'दिलवर' 'भगवंता' चरणी, मागने मागली
सुख शान्तीने ठेव जगाला, हेच वर मागली
रक्तदान हे खुशीने करती, हरदेवाला स्मरुनी
गुरु वचनाचे पालन करुया रक्तदान करुनी .......
मानव एकता मिशन जागवी, घे तू हे समझुनी